# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग – पोलीस मित्र उपक्रम**

लोकमत पुणे, शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०१५ ३

# विद्यार्थ्यांनी सांभाळली सुरक्षाव्यवस्था

## भीमाशंकर : राजगुरुनगर विद्यालयाचा पुढाकार



भीमाशंकर येथे पोलीस मित्र म्हणून काम करणारे हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील स्वयंसेवक.

चासकमान : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सुमारे ६० विद्यार्थ्यांनी पोलीस मित्र म्हणून भीमाशंकर येथे श्रावण महिन्यात सुरक्षाव्यवस्थेचे काम चोखपणे पार पाडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

खेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस उपनिरीक्षक चेतन माने, सहायक पोलीस निरीक्षक गणेश म्हस्के, पोलीस नाईक संजय नाडेकर, राजेश नलावडे, विक्रम तापकीर, पोलीस कॉन्स्टेबल विठ्ठल वडेकर यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. मंदिर परिसर, दर्शनरांग, मंदिरांतर्गत सुरक्षेच्या कामात या विद्यार्थ्यांनी चोख सहकार्य केले. त्यांना खेड पोलीस ठाण्याच्या वतीने टी शर्ट, टोपी व ओळखपत्र देण्यात आले. येणाऱ्या गणपती व नवरात्र उत्सवांतही राष्ट्रीय सेवा योजनेचे शंभर विद्यार्थी पोलीस मित्र म्हणून सहभागी होणार आहेत. या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. रुपाली वायळ, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. धनंजय वाघ, डॉ. महेश घाडगे तसेच भूषण सांडभोर, ओंकार बोंबले, सुमीत भुजबळ, आकाश नवरे व अक्षय गायकवा[ड] यांनी केले. (वार्ताहर)

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख